जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 SEP 2017

तरुण भारत

# कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना 'मराठवाडा भूषण पुरस्कार'

प्रतिनिधी
कोल्हापूर

पुणे येथील मराठवाडा समन्वय समितीच्या वतीने देण्यात येणारा 'मराठवाडा भूषण पुरस्कार' यंदा शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना जाहीर झाला आहे. पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरामध्ये उद्या (दि. १७) रोजी सायंकाळी ६ वाजता पुरस्कार प्रदान सोहळा होईल.

मराठवाडा समन्वय समितीतर्फे दरवर्षी १७ रोजी मराठवाडा मुक्तिदिन महोत्सव साजरा केला जातो. या निमित्ताने विविध क्षेत्रांतील उत्तुंग कामगिरी बजावून मराठवाड्याचा लौकिक वाढविणाऱ्या मान्यवरांना 'मराठवाडा भूषण पुरस्कार' देऊन गौरविण्यात येते. यावर्षी कुलगुरू डॉ. शिंदे यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते सुभाष वारे, पीएमआरडीएचे मुख्य कार्यकारी अधिकारी किरण गुत्ते, लेखक डॉ. शमशुद्दीन तांबोळी, उद्योजक ओमप्रकाश पेठे आणि प्रगतशील शेतकरी ईश्वरदास घनघाव यांनाही या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.



पुण्याच्या बालगंधर्व रंगमंदिरात होणाऱ्या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून बी.व्ही.जी. इंडिया कंपनीचे संस्थापक, चेअरमन हनुमंतराव गायकवाड प्रमुख उपस्थित राहणार आहेत. ज्येष्ठ समाजसेवक डॉ. द्वारकादास लोहिया अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. यावेळी 'वैभवशाली मराठवाडा' या वार्षिक विशेषांकाचे प्रकाशन होणार आहे, अशी माहिती समितीच्या वतीने देण्यात आली.

16 SEP 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात रंगली फुटबॉल स्पर्धा

## चौदा संघ सहभागी : 'महाराष्ट्र मिशन वन मिलियन' उपक्रमांतर्गत आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : 'महाराष्ट्र फुटबॉल मिशन वन मिलियन' या उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी फुटबॉल स्पर्धा रंगली. यात सहभागी झालेल्या चौदा संघांमध्ये विद्यार्थिनींच्या चार संघांचा समावेश होता.

विद्यापीठाच्या क्रीडा मैदानावर सकाळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन झाले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, आदी उपस्थित होते.

या स्पर्धेत विद्यापीठातील वनस्पतिशास्त्र, पर्यावरणशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, प्राणिशास्त्र, नॅनो-सायन्स व तंत्रज्ञान, तंत्रज्ञान अधिविभाग यांच्यासह शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज, स. ब. खाडे महाविद्यालय, कोपार्डे, गोपाळकृष्ण गोखले महाविद्यालय, केआयटी कॉलेज या महाविद्यालयांचे एकूण चौदा संघ सहभागी झाले.

जे. एच. इंगळे, डॉ. अभिजित वणिरे, एन. आर. कांबळे, धनंजय पाटील, राहुल मगदूम, विक्रम नांगरे, गॅब्रिएल रॉड्रिग्ज, शशी दाभाडे यांनी स्पर्धेचे संयोजन केले.



कोल्हापुरात शुक्रवारी शिवाजी विद्यापीठातील 'महाराष्ट्र फुटबॉल मिशन वन मिलियन' या उपक्रमाचे उद्घाटन प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी विविध संघांतील खेळाडू, प्रशिक्षक, आदी उपस्थित होते.

16 SEP 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात फुटबॉल स्पर्धेप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदी. (छाया : एस. अली)



कडगाव : फुटबॉल स्पर्धेवेळी मार्गदर्शन करताना ए. एम. भडगावकर. सोबत विद्यार्थी व इतर मान्यवर.



सैनिक टाकळी : येथे फुटबॉल स्पर्धेचा प्रारंभ करताना उपसरपंच रणजित पाटील. शेजारी सरपंच वंदना माळगे व इतर.

# महाराष्ट्र फुटबॉल मिशनला अपूर्व प्रतिसाद

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

महाराष्ट्र शासनाच्या 'महाराष्ट्र फुटबॉल मिशन वन मिलियन' या उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या फुटबॉल स्पर्धेला उत्साहपूर्ण प्रतिसाद लाभला. स्पर्धेत सहभागी झालेल्या चौदा संघांमध्ये विद्यार्थिनींच्या चार संघांचा समावेश होता.

सकाळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली दिवसभरात विद्यापीठाच्या क्रीडा मैदानावर या फुटबॉल स्पर्धा पार पडल्या.

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांनी फुटबॉलला किक मारून स्पर्धेचे उद्घाटन केले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनीही स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या असल्याचे त्यांनी सांगितले. फेडरेशन ऑफ इंटरनॅशनल फुटबॉल असोसिएशन (फिफा) यांच्यातर्फे १७ वर्षांखालील खेळाडूंसाठी फुटबॉल वर्ल्डकप स्पर्धा ६ ते २८ ऑक्टोबर या कालावधीत भारतात होत आहे. स्पर्धेतील एकूण सामन्यांपैकी सहा सामने महाराष्ट्रात नवी मुंबई येथे होणार आहेत. या स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर राज्यात फुटबॉलची आवड निर्माण व्हावी व अधिकाधिक युवकांनी मैदानी खेळांसाठी प्रवृत्त व्हावे, यासाठी 'महाराष्ट्र फुटबॉल मिशन वन मिलियन' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाला विद्यापीठातील अधिविभाग व महाविद्यालयांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शुक्रवारच्या स्पर्धेत विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र, पर्यावरणशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, प्राणीशास्त्र, नॅनो सायन्स व तंत्रज्ञान, तंत्रज्ञान अधिविभाग यांसह शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज, स. ब. खाडे महाविद्यालय, कोपार्डे, गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालय, केआयटी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग या महाविद्यालयांचे एकूण चौदा संघ सहभागी झाले. त्यामध्ये चार मुलींचे संघही सहभागी झाले होते.

स्पर्धा यशस्वी होण्यासाठी जे. एच. इंगळे, डॉ. अभिजित वणिरे, एन. आर. कांबळे, धनंजय पाटील, राहुल मगदूम, विक्रम नांगरे, गॅब्रिएल रॉड्रिग्ज, शशी दाभाडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

**सैनिक टाकळीत सामने**

**सैनिक टाकळी :** श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व गर्ल्स हायस्कूलमध्ये फुटबॉलचे सामने घेण्यात आले. सरपंच वंदना माळगे, उपसरपंच रणजित पाटील यांच्या हस्ते मैदानाचे पूजन करून स्पर्धेस सुरुवात झाली. प्रमुख पाहुण्यांचा सत्कार दोन्ही शाळांच्या वतीने मुख्याध्यापिका मुल्ला व उदय पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. स्वागत ए. ए. इंगवले यांनी केले. सचिन काटकर यांनी आभार मानले.



कसबा सांगाव : बॉईज अॅण्ड गर्ल्स हायस्कूलमध्ये फुटबॉलचा आनंद लुटताना विद्यार्थी.

**कडगावमध्ये अनिकेत जाधवला शुभेच्छा**

**कडगाव :** राज्य शासनाच्या शिक्षण व क्रीडा विभागामार्फत 'मिशन फुटबॉल मिलेनियम' अंतर्गत नियोजनानुसार शुक्रवारी फुटबॉल स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. फिफा वर्ल्ड कप स्पर्धेत सहभागी होणाऱ्या देशाच्या संघात महाराष्ट्रातून सहभागी होणारा एकमेव खेळाडू अनिकेत जाधव (कोल्हापूर) याला शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी चित्रकला स्पर्धेचेसुद्धा आयोजन करण्यात आले होते.

कडगाव हायस्कूल व श्री समर्थ ज्युनिअर कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांच्या फुटबॉल स्पर्धा झाल्या. यात हायस्कूलच्या विद्यार्थी, विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. स्पर्धेचे उद्घाटन एम. व्ही. लाड यांच्या हस्ते झाले. प्राचार्य एल. जी. हावलदार, ए. डी. देसाई, बी. ए. डावरे, सी. एस. मासाळ, सी. एस. लिमकर, डी. जी. पाटील, बी. एस. राणे, वजीर मकानदार, रॉबिन डिसोजा यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. स्पर्धेचे संयोजन क्रीडा विभागप्रमुख ए. एम. भडगावकर, आर. एन. चव्हाण यांनी केले.

**मुलांनी लुटला फुटबॉलचा आनंद**

**कसबा सांगाव :** येथील शाळेमध्ये कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्याध्यापिका एस. ए. माने यांनी नाणेफेक करून केले. फुटबॉल खेळणाऱ्या सर्वच मुलांच्या चेहऱ्यावर खेळण्याचा आनंद द्विगुणीत झाला होता. सर्वच मुला-मुलींनी प्रोत्साहनासाठी आपापल्या टीमला प्रतिसाद दिला. पंच म्हणून शाम दिवटे यांनी काम पाहिले. एस. आर. कोळेकर, बी. एस. घुले, एस. बी. घाटगे, आर. बी. गावित, ए. एस. केंगार, आर. बी. मिरजे, गौरी पाटील, शीतल चव्हाण, तृप्ती कांबळे, पी. एस. घुले, सतीश घुमाळ, नंदू गोंधळी, सर्व प्राथमिक शिक्षक, पालक उपस्थित होते. स्वागत किरण घाटगे यांनी, तर प्रास्ताविक व सूत्रसंचालन बी. एस. घुले यांनी केले. आर. बी. गावित यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 SEP 2017

तरूण भारत

# महाराष्ट्र फुटबॉल मिशन वन मिलीयन उपक्रम विद्यापीठात उत्साहात

प्रतिनिधी
कोल्हापूर

महाराष्ट्र शासनाच्या 'महाराष्ट्र फुटबॉल मिशन वन मिलीयन' या उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी आयोजित करण्यात आलेल्या फुटबॉल स्पर्धेला उत्साहपूर्ण प्रतिसाद लाभला. या स्पर्धेत विद्यार्थिनींच्याही चार संघांचा समावेश राहिला, हे विशेष आहे.

शुक्रवारी सकाळी विद्यापीठाच्या क्रीडा मैदानावर या फुटबॉल स्पर्धा झाल्या. यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धा सुरू आहेत. दरम्यान, प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांनी फुटबॉलला कीक मारून स्पर्धेचे उद्घाटन केले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनीही स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

राज्यात फुटबॉलची आवड निर्माण व्हावी व अधिकाधिक युवकांनी मैदानी खेळांसाठी प्रवृत्त व्हावे, यासाठी 'महाराष्ट्र फुटबॉल मिशन १ मिलीयन' हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

स्पर्धेत विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र, पर्यावरणशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, प्राणीशास्त्र, नॅनो सायन्स व तंत्रज्ञान, तंत्रज्ञान अधिविभाग यांसह शिवराज महाविद्यालय- गडहिंग्लज, स.ब. खाडे महाविद्यालय-कोपार्डे, गोपाळकृष्ण गोखले महाविद्यालय- कोल्हापूर, केआयटी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग- कोल्हापूर या महाविद्यालयांचे एकूण चौदा संघ सहभागी झाले. त्यामध्ये चार मुलींचे संघही सहभागी झाले. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी जे.एच. इंगळे, डॉ. अभिजीत वणिरे, एन. आर. कांबळे, धनंजय पाटील, राहुल मगदूम, विक्रम नांगरे, गॅब्रिएल रॉड्रिग्ज, शशी दाभाडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

16 SEP 2017
महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'गोल...गोल...गोल'चा जयजयकार

'महाराष्ट्र फुटबॉल मिशन मिलियन'ला कोल्हापुरात प्रारंभ

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

मराठमोळ्या हलगीचा घुमका, फुटबॉल थीम साँग, आफ्रिकी नृत्यांवर कलाकारांनी धरलेला ठेका, सिग्नेचर पॉइंटवर शुभेच्छांचा वर्षाव, सेल्फी पॉइंटवर छबी टिपण्यासाठी तरुणाईची गर्दी, भारतीय संघातील स्टार फुटबॉलपटू अनिकेत जाधवचे कटाउट्स आणि चिमुकल्यांच्या फुटबॉल सामन्यात अचूक फटक्याने साधलेला गोल आणि नंतर विद्यार्थ्यांचा घुमलेला गोल... गोल...गोल...चा आवाज, अशा उल्हासी वातावरणात महाराष्ट्र हायस्कूलच्या मैदानावर 'महाराष्ट्र फुटबॉल मिशन मिलियन' कार्यक्रमात फुटबॉलचा जयजयकार झाला. जिल्ह्यातील साडेनऊशेहून अधिक शाळांमध्ये शुक्रवारी विद्यार्थ्यांनी फुटबॉल सामन्याचा आनंद लुटून १७ वर्षे वयोगटातील विश्वचषक फुटबॉल स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



**महाराष्ट्र फुटबॉल मिशन वन मिलियन उपक्रमाचे उद्घाटन करताना पालकमंत्री चंद्रकांत पाटील. डावीकडून प्रिन्स शिवाजी बोर्डिंगचे अध्यक्ष एस. आर. चरापले, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, महापौर हसीना फरास, शिक्षणतज्ज्ञ डी. बी. पाटील, आमदार अमल महाडिक, आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, जि.प.चे सीईओ डॉ. कुणाल खेमणार, सुजय पित्रे, जिल्हा क्रीडाधिकारी माणिक वाघमारे.**

सतरा वर्षांखालील फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धा ६ ते २४ ऑक्टोबरदरम्यान भारतात होणार आहे. विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या निमित्ताने शुक्रवारी संपूर्ण महाराष्ट्रात 'महाराष्ट्र फुटबॉल मिशन वन मिलियन' उपक्रमांतर्गत दहा लाखांहून अधिक विद्यार्थी फुटबॉल खेळणार आहेत. या उपक्रमाचा प्रारंभ महाराष्ट्र हायस्कूलच्याच्या क्रीडांगणावर पालकमंत्री चंद्रकात पाटील यांनी फुटबॉलची किक मारून केला. विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या निमित्ताने एक उत्साही वातावरण निर्माण व्हावे यासाठी सर्वांनी मिळून आज पुन्हा एकदा फुटबॉलमय होऊया आणि क्रीडा संस्कृती रुजवूया, असे आवाहन पालकमंत्र्यांनी केले.

या उपक्रमाचा जास्तीत जास्त प्रचार आणि प्रसार होण्यासाठी उभारलेल्या सिग्नेचर पॉइंटवर पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी 'आय एम प्राउड ऑफ यू, आय लव्ह यू टीम इंडिया, शंभर टक्के यशासाठी अंबाबाई चरणी प्रार्थना' अशा भावना व्यक्त करून स्वाक्षरी करत भारतीय संघाला शुभेच्छा दिल्या. तसेच सेल्फी पॉइंटचे उद्घाटनही केले. श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांनी, फुटबॉल हा जगभरात सर्वांत लोकप्रिय असणारा खेळ असल्याने महाराष्ट्राने यात मागे राहून चालणार नाही असे सांगून या खेळामुळे सर्वांगीण विकास होईल. कोल्हापुरात त्यासाठी पोषक वातावरण आहे. त्यामुळे या खेळाला प्रोत्साहन देण्याची आवश्यकता व्यक्त केली.

महापौर हसीना फरास यांनीही महाराष्ट्र फुटबॉल मिशन वन मिलियनला शुभेच्छा दिल्या. डी. बी. पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रा. अमर सासने यांनी प्रास्ताविक केले. जिल्हा क्रीडा अधिकारी माणिक वाघमारे यांनी आभार मानले. व्हॉलिबॉल प्रशिक्षक अजित पाटील यांनी सूत्रसंचलन केले. यावेळी फिफा वर्ल्डकप साँगवरील गाण्यांवर युवकांनी, तर महाराष्ट्र हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी आदिवासी नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाला आमदार चंद्रदीप नरके, आमदार अमल महाडिक, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, पोलिस अधीक्षक संजय मोहिते, मुख्य कार्यकारी अधिकारी कुणाल खेमणार, आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाउसचे चेअरमन डी. बी. पाटील. अध्यक्ष एस. आर. चरापले उपस्थित होते.

### विद्यापीठातही स्पर्धेचे आयोजन

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा मैदानावर फुटबॉल स्पर्धांचे आयोजन केले होते. स्पर्धे सहभागी चौदा संघांमध्ये मुलींच्याही चार संघांचा समावेश होता. शुक्रवारी सकाळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी .टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी.के. गायकवाड क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली दिवसभरात विद्यापीठाच्या क्रीडा मैदानावर फुटबॉल स्पर्धा पार पडल्या. प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांनी फुटबॉलला कीक मारून स्पर्धेचे उद्घाटन केले.

### 'शिवाजी', 'शाहू'चे स्ट्रक्चरल ऑडिट करणार

कोल्हापुरात शाहू स्टेडियम व शिवाजी स्टेडियमवर फुटबॉलचे सामने होतात; पण तेथील सुविधांची वानवा आहे. या मैदानांचे स्ट्रक्चरल ऑडिट करून खेळाशी संबंधित आवश्यक त्या सर्व सुविधा तेथे उपलब्ध करून दिल्या जातील. त्यासाठी जिल्हा नियोजन मंडळ व राज्य सरकारकडून निधी उपलब्ध करून दिला जाईल, अशी ग्वाही पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

16 SEP 2017 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मोबाईलबद्दल मुलांमध्ये जनजागृती अत्यावश्यक

## प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : विद्यापीठात राष्ट्रीय सेवा योजनेच्या समन्वयकांसाठी कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

गॅझेटमध्ये लोक असे गुंतून जातात की त्यावर त्यांचा मूड अवलंबून असतो. ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. पालकांकडून मुलांना ज्ञानासाठी मोबाईल दिला जातो की जीवीताची हानी करून घेण्यासाठी हे पाहण्याची वेळ आलेली आहे. कारण ब्ल्यू व्हेल गेमच्या परिणामाने त्याचे दुष्परिणाम दाखवले आहेत. त्यामुळे मोबाईलबद्दल पालकांबरोबरच विद्यार्थ्यांमध्येही राष्ट्रीय सेवा योजनेच्या समन्वयकांच्या माध्यमातून जनजागृती निर्माण करण्याची गरज आहे असे प्रतिपादन विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभाग आणि युनिसेफ (महाराष्ट्र) यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयीन राष्ट्रीय सेवा योजनेच्या समन्वयकांसाठी बालकांचे शिक्षण त्यांच्या हक्कांचे संरक्षण या सामाजिक जागृतीपर दोन दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. मानव्यविद्या सभागृहात ही कार्यशाळा झाली. प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, युनिसेफ जगभरातील मुलांच्या प्रगतीसाठी विविध उपक्रम राबवित असते. युनिसेफने ब्ल्यू व्हेल खेळावर अभ्यास करून मुलांना यापासून परावृत्त करण्यासाठीचे प्रयत्न सुरू केले आहेत. बालकांचे जीवनमान उंचावण्यासाठी युनिसेफचे कार्य स्तुत्य आहे.

यावेळी अधिविभाग प्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी प्रास्ताविक केले. यावेळी युनिसेफ (महाराष्ट्र) चे संवाद सल्लागार तानाजी पाटील, महादेव माळी, महिला आणि बालकल्याण विभागातील जयंत पवणीकर, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे आदींसह महाविद्यालयीन एनएसएस समन्वयक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यशाळेमध्ये तानाजी पाटील, महादेव माळी, जयंत पवणीकर यांनी नवजात अर्भक, शाळेचे विद्यार्थी आदी विषयांवर चर्चा केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 SEP 2017

तरुण भारत

# बालकांचे जीवनमान उंचावण्यासाठी युनिसेफचे कार्य कौतुकास्पद

**कोल्हापूर :** बालकांचे जीवनमान उंचावण्यासाठी युनिसेफचे कार्य स्तुत्य आहे, असे गौरवोद्गार विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी काढले. शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभाग आणि युनिसेफ (महाराष्ट्र) यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयीन राष्ट्रीय सेवा योजनेच्या समन्वयकांसाठी बालकांचे शिक्षण, त्यांच्या हक्कांचे संरक्षण या सामाजिक जागृतीपर दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेचे उद्घाटन प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, युनिसेफ जगभरातील मुलांच्या प्रगतीसाठी विविध उपक्रम राबवित असते. युनिसेफने ब्ल्यू व्हेल खेळावर अभ्यास करुन मुलांना यापासून परावृत्त करण्यासाठीचे प्रयत्न सुरु केले आहेत. पालकांकडून मुलांना ज्ञानासाठी मोबाईल दिला जातो की जीवीताची हानी करुन घेण्यासाठी, यावर चिंतन करण्याची वेळ आली आहे. त्यामुळे मोबाईलबद्दल पालकांबरोबरच विद्यार्थ्यांमध्येही राष्ट्रीय सेवा योजनेच्या समन्वयकांच्या माध्यमातून जागरूकता निर्माण करण्याची गरज निर्माण झालेली आहे, असेही त्यांनी नमुद केले. यावेळी युनिसेफ (महाराष्ट्र)चे संवाद सल्लागार तानाजी पाटील, महाराष्ट्र शासनाच्या स्वच्छता व पाणीपुरवठा विभागातील सेवानिवृत्त महादेव माळी, महिला आणि बालकल्याण या विभागातील जयंत पवणीकर, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे यांच्यासह तीनही जिल्हयातील महाविद्यालयीन एनएसएस समन्वयक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दिवसभरात कार्यशाळेमध्ये तानाजी पाटील, महादेव माळी, जयंत पवणीकर यांनी नवजात अर्भक, शाळेचे विद्यार्थी आदी विषयांवर विस्तृत चर्चा केली. अधिविभाग प्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी स्वागत, प्रास्ताविक व परिचय करुन दिला.

16 SEP 2017 पुढारी. जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बालमजुरी प्रतिबंधासाठी समाजघटकांनी पुढाकार घ्यावा

## कुलसचिव डॉ. नांदवडेकर : विद्यापीठात पत्रकारांसाठी कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

देशातील साधारणपणे निम्म्या बालकांना आज पुरेसा आहार मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. अन्न आणि शिक्षणाच्या बरोबरीनेच बालमजुरीला प्रतिबंध करण्यासाठी पत्रकारांबरोबरच प्रत्येक समाजघटकाने कृतिशील पुढाकार घ्यावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी गुरुवारी केले.

शिवाजी विद्यापीठ वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभाग आणि युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण पत्रकारांसाठी आयोजित बालहक्कविषयक जागृतीपर एकदिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. नांदवडेकर यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. मानव्यशास्त्र सभागृहात ही कार्यशाळा झाली.

डॉ. नांदवडेकर म्हणाले, बालहक्कांचा विषय माध्यमांनी तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी योग्य पद्धतीने मांडल्यास हजारो हात मदतीसाठी पुढे सरसावतील. बाल आरोग्याचा प्रश्न प्राधान्याने हाताळायला हवा. आरोग्य चांगले राहण्यासाठी उत्तम आहार आणि त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी उत्तम शिक्षण सुविधांची उपलब्धता करून देणे हे आपल्या पुढील प्राधान्यक्रमाचे मुद्दे असायला हवेत. बालमजूर आढळल्यास त्यांच्याशी संवाद साधून, योग्य मार्गदर्शन करून त्यांना शाळेत जायला प्रवृत्त करायला हवे. केंद्र सरकारने त्यांना प्रदान केलेल्या शिक्षणाच्या अधिकारांतर्गत मोफत शिक्षण आणि माध्यान्ह पोषण आहार याविषयीची माहिती देऊन शिक्षणाच्या प्रवाहात त्यांना सामील होण्यासाठी प्रोत्साहन देण्याची गरज आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभाग आणि युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण पत्रकारांसाठी गुरुवारी आयोजित बालहक्कविषयक जागृतीपर एकदिवसीय कार्यशाळेत बोलताना डॉ. विलास नांदवडेकर. डावीकडून डॉ. शिवाजी जाधव, प्रवीण पाटील, तानाजी पाटील, डॉ. निशा मुडे-पवार.

डॉ. नांदवडेकर यांनी मध्य आफ्रिकेतील रवांडा या देशाला भेट दिली होती. तेथील बालकांची विदारक परिस्थिती त्यांनी यावेळी मांडली. ते म्हणाले, दररोज पाऊस होणाऱ्या या देशातील नागरिकांची आर्थिक परिस्थिती बिकट आहे. एका कुटुंबात किमान दहा मुले असतात. साहजिकच त्यांच्या दारिद्र्यपूर्ण परिस्थितीत भरच पडते. मुलांच्या अंगावर कपडे नाहीत. कित्येक मुले रस्त्यावरील माती खाताना दिसून आली. या पार्श्वभूमीवर तेथे बालहक्कांचे काम सुरू होते. मुलांच्या मूलभूत अन्न, वस्त्र या गरजा भागवून त्यांना शिक्षण आणि आरोग्य सुविधांची उपलब्धता करणे हे प्रत्येक शासनाचे कर्तव्य आहे. परंतु, २०१० च्या एका आकडेवारीनुसार, आपल्या देशात एका मुलामागे आपण दैनंदिन ४.४४ रुपये खर्च करतो, तर विकसित देशांत हा आकडा चौपटीहून अधिक आहे.

स्वागत अधिविभाग प्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी केले. सूत्रसंचालन चंद्रशेखर वानखेडे यांनी केले. यावेळी युनिसेफ (महाराष्ट्र) चे संवाद सल्लागार तानाजी पाटील, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, पत्रकार, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. दरम्यान, दिवसभरात कार्यशाळेत सी.डब्ल्यूसी (कोल्हापूर) चे अतुल देसाई, युनिसेफचे तानाजी पाटील आणि कोल्हापूरच्या शहाजी विधी महाविद्यालयाचे डॉ. प्रवीण पाटील यांनी बालहक्कांच्या विविध पैलूंवर प्रकाशझोत टाकला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 SEP 2017
Times of India

# Workshop on child related issues at SUK

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** A one-day workshop on various issues related to child rights was organised in association with the UNICEF, Maharashtra, at the Shivaji University, Kolhapur (SUK) on Thursday.

Various issues such as— bringing out of school students into mainstream education, lowering infant mortality rate and sanitation was discussed. The meet was organised for journalists from rural areas.

SUK registrar Vilas Nandavadekar said that there is a dire need to spread awareness about child rights.

He added that many children don't get access to quality food, clothing and shelter.

Atul Desai, a member of Kolhapur child welfare committee said that people need to be empathetic about the current plight of children.

TOI



SUK registrar delivers a speech during journalism workshop

## CAMPUS BUZZ

**VC Devanand Shinde to receive Marathwada Bhushan award:** Shivaji University, Kolhapur (SUK) vice-chancellor (VC) Devanand Shinde will be presented the Marathwada Bhushan award on Sunday at Pune.

Born in Osmanabad, Shinde studied MSc in chemical technology at the Babasaheb Ambedkar Marathwada University (Bamu) in Aurangabad.

Before his appointment as SUK VC, he was working as a professor of chemical technology with 22 years of experience.

Shinde has three patents to his credit. There are more than 180 research publications to his credit.

16 SEP 2017
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मुले घरातच सर्वाधिक असुरक्षित

## तानाजी पाटील : वृत्तपत्रविद्या विभागातर्फे पत्रकारांसाठी कार्यशाळा

कोल्हापूर, ता. १५ : राज्यातील नऊ जिल्ह्यांमध्ये पाच हजार मुलांची पाहणी केल्यानंतर बहुतेक मुलांना स्वतःच्या घरातच सर्वाधिक असुरक्षित वाटत असल्याचे निष्कर्ष समोर आले आहेत, त्यामुळे मुलांत विश्वासाचे वातावरण तयार करणे आवश्यक असल्याची माहिती, युनिसेफचे राज्य संज्ञापन सल्लागार तानाजी पाटील यांनी दिली. शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाच्या वतीने येथील मानव्यशास्त्र सभागृहात आयोजित पत्रकारांच्या एकदिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार अध्यक्षस्थानी होत्या.

श्री. पाटील म्हणाले, ''मुलांवर वर्चस्व गाजविण्यासाठी पालक आपली मते त्यांच्यावर लादतात. याचा मुलांवर विपरित परिणाम होतो. मुले स्वतःला असुरक्षित समजू लागली आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाच्या निकषानुसार मुलांसाठी प्रत्येक देशाने एकूण अर्थसंकल्पाच्या ९ टक्के रक्कम राखीव ठेवली पाहिजे. परंतु भारतात हे प्रमाण केवळ ०.९ इतके अत्यल्प आहे.'' शहाजी लॉ कॉलेजमधील डॉ. प्रवीण पाटील म्हणाले, ''राज्यघटनेच्या कलम २१ अंतर्गत खूप अधिकार दिले आहेत. वेळोवेळी या कलमाचे न्यायाधीशांनी विश्लेषण केले असल्याने आज हे कलम अत्यंत व्यापक आणि लोकाभिमुख बनले आहे.'' डॉ. सुमेधा साळुंखे, चंद्रशेखर वानखेडे उपस्थित होते. डॉ. शिवाजी जाधव यांनी आभार मानले.

### विधी संघर्षग्रस्त बालक आणि बालगृह...

**जिल्हा बालकल्याण समितीचे सदस्य अतुल देसाई म्हणाले, ''माध्यमांनी बालगुन्हेगार शब्द वापरू नये. कायद्याने या शब्दावर बंधने घातली आहेत. त्याऐवजी विधी संघर्षग्रस्त बालक असा शब्दप्रयोग करावा. अल्पवयीन मुलाने गुन्हा केला असेल तर त्याला बाल गृहात पाठविले जाते. परंतु प्रसारमाध्यमातून बालसुधारगृहात मुलाची रवानगी असे प्रसिद्ध होते. सध्या बालसुधार गृह या शब्दावर बंदी असून त्याऐवजी बालगृह असा शब्दप्रयोग करावा.''**



16 SEP 2017
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या अधिकार मंडळांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर

## कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांची माहिती :१७ नोव्हेंबरला मतदान : २० ला मतमोजणी

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. विद्यापीठाच्या अधिसभेसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम, २८ (२) (टी) नुसार ५ खुल्या प्रवर्गातील व १ महिला, अनुसूचित जाती-१, अनुसूचित जमाती-१, विमुक्त जाती-भटक्या जमाती-१, इतर मागासवर्गीय-१ अशा ५ जागा मिळून दहा पदवीधरांसाठी निवडणूक १७ नोव्हेंबरला होणार आहे. मतदान केंद्राची यादी व निवडणुकीबाबतची संपूर्ण कार्यक्रम पत्रिका व माहिती निवडणूक अधिसूचनेद्वारे विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर युनिर्व्हसिटी इलेक्शन २०१७ या लिंकवर व विद्यापीठाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेली आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी एका प्रसिध्दीपत्रकातून दिली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम २८ (२) (ओ), २८ (२) (पी), २८ (२) (आर) व २८ (२) (एस) नुसार अधिसभेवर अनुक्रमे १० प्राचार्य, ६ संस्था प्रतिनिधी, १० महाविद्यालयीन शिक्षक व ३ विद्यापीठ शिक्षक



तसेच कलम ३२ (३) (जी) नुसार विद्यापरिषदेवर ८ शिक्षक (प्रत्येक विद्याशाखेतून दोन) यामध्ये एक महिला व एक राखीव संवर्गातून चिठ्या टाकून काढलेल्या सोडतीद्वारे ठरवण्यात आल्याप्रमाणे व कलम ४० (२) (सी) नुसार ३ महाविद्यालयीन विभागप्रमुख यांच्या निवडणुकीसाठी १७ नोव्हेंबर रोजी विद्यापीठाने निश्चित केलेल्या मतदान केंद्रावर मतदान होणार आहे.

**निवडणूक कार्यक्रम असा :**

१. तातुपुरती मतदार यादी प्रसिद्ध तारीख – १५ सप्टें.
२. मतदार यादीस दुरूस्ती सुचवण्याची अंतिम तारीख – २० सप्टें. सायं. ५ पर्यंत
३. दुरूस्त्या केल्यानंतरची अंतिम मतदार यादी – १२ ऑक्टो.
४. निवडणूक नोटीस तारीख – २२ ऑक्टो.
५. उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम तारीख – ३१ ऑक्टो. सायं. ५ पर्यंत.
६. उमेदवारी अर्ज छानननी – २ नोव्हें.
७. उमेदवारी अर्ज माघार – ४ नोव्हें. सायं. ५ पर्यंत.
८. पात्र उमेदवारांची यादी – ६ नोव्हें.
९. मतदान – १७ नोव्हें. सकाळी ९ ते सायं. ५ पर्यंत.
१०. मतमोजणी व निकाल – २० नोव्हेंबर.

विविध अधिकार मंडळांवर निवडून द्यावयाच्या जागांचे तपशील, मतदान केंद्राची यादी व निवडणुकीबाबतची माहिती अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

16 SEP 2017 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अधिसभेची निवडणूक १७ नोव्हेंबरला

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांच्या अधिसभेची निवडणूक १७ नोव्हेंबर २०१७ रोजी होणार आहे. मतमोजणी व निकाल २० नोव्हेंबरला जाहीर केला जाणार आहे. नव्या विद्यापीठाच्या कायद्यानुसार ही निवडणूक होत आहे. निवडणूक कार्यक्रमाची सविस्तर माहिती प्रशासनाकडून वेबसाईटवरून शुक्रवारी जाहीर करण्यात आली. निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर राजकीय हालचालींना वेग आला आहे. पदवीधर, संस्था, प्राचार्य आदी गटांतील पन्नासहून अधिक जागांसाठी निवडणूक होत आहे. यासाठी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होण्याची प्रक्रिया अद्याप सुरू आहे. तरीही पंधरा हजारांहून अधिक मतदार असणार आहेत.

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम २८ (२) टी नुसार ही निवडणूक होणार आहे. निवडणुकीची प्रक्रिया मात्र १५ सप्टेंबरपासून सुरू झाली. तात्पुरती मतदार यादी १५ सप्टेंबरला प्रसिद्ध झाली आहे. मतदार यादीत दुरुस्ती सुचवण्याची अंतिम तारीख २० सप्टेंबरपर्यंत असणार आहे. अंतिम मतदार यादी १२ ऑक्टोबरला प्रसिद्ध केली जाणार आहे. निवडणुकीची नोटीस २२ ऑक्टोबरला काढली जाणार आहे. उमेदवारी अर्ज भरण्याचा अंतिम दिवस ३१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी पाच वाजेपर्यंत असणार आहे. अर्जांची छाननी २ नोव्हेंबरला तर अर्ज माघार ४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी पाच वाजेपर्यंत असणार आहे. पात्र उमेदवारांची यादी ६ नोव्हेंबरला प्रसिद्ध केली जाईल. मतदान शुक्रवारी (दि.१७) सकाळी नऊ ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत विविध केंद्रांत होणार आहे. मतमोजणी व निकाल २० नोव्हेंबरला जाहीर केला जाणार आहे. कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील ३३ केंद्रांवर मतदान होणार आहे.



शिवाजी विद्यापीठातून

- वेबसाईटवर निवडणूक कार्यक्रम जाहीर
- विद्यापीठ वर्तुळात हालचालींना वेग
- पंधरा हजारांवर मतदार

**मतदारांनी तत्काळ संपर्क साधावा**

निवडणूक कार्यक्रमानुसार विहित केलेल्या तारखांचे कटाक्षाने पालन करणे आवश्यक आहे. ज्यांची तात्पुरत्या मतदारयादीत नावे समाविष्ट झालेली नाहीत आणि त्रुटींच्या यादीत कागदपत्रे सादर न झाल्याने किंवा अन्य कारणांनी नाव अपात्र यादीत आलेले असेल आणि संबंधित मतदाराकडे आवश्यक कागदपत्रे असल्यास ती त्यांनी पाच दिवसांच्या आत म्हणजे २० सप्टेंबर २०१७ पूर्वी विद्यापीठ कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे, असे निवडणूक अधिकारी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी स्पष्ट केले आहे.

16 SEP 2017 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ निवडणूक कार्यक्रम जाहीर

## १७ नोव्हेंबर रोजी मतदान, तर २० रोजी मतमोजणी

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला. यानुसार विविध अधिकार मंडळांची निवडणूक १७ नोव्हेंबरला होत असून, मतमोजणी २० नोव्हेंबरला केली जाणार आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठाच्या नव्या कायद्यानुसार ही निवडणूक होत आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ (२) टी नुसार ही निवडणूक होणार आहे. निवडणुकीची प्रक्रिया १५ सप्टेंबरपासून सुरू झाली आहे. मतदार यादीत दुरुस्ती सुचविण्याची अंतिम तारीख २० सप्टेंबरपर्यंत असणार आहे. अंतिम मतदार यादी १२ ऑक्टोबरला प्रसिद्ध केली जाणार आहे. २२ ऑक्टोबरला निवडणुकीची नोटीस काढली जाईल. उमेदवारी अर्ज भरण्याचा अंतिम दिवस ३१ ऑक्टोबर संध्याकाळी पाच वाजेपर्यंत असणार आहे. अर्ज छाननी २ नोव्हेंबरला, तर अर्ज माघार ४ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी पाच वाजेपर्यंत असणार आहे. पात्र उमेदवारांची यादी ६ नोव्हेंबरला प्रसिद्ध केली जाईल. मतदान शुक्रवार, दि. १७ नोव्हेंबर सकाळी नऊ ते सायंकाळी



पाच वाजेपर्यंत विविध केंद्रांत होणार आहे. मतमोजणी व निकाल २० नोव्हेंबरला जाहीर केला जाणार आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर राजकीय हालचालींना वेग आला आहे. संस्था, प्राचार्य आदी गटांतील १८८ जागांसाठी निवडणूक होत आहे. यासाठी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होण्याची प्रतीक्षा आहे. तरीही १५ हजार मतदार असणार आहेत; मात्र ज्यांची नावे तात्पुरत्या मतदार यादीत नाहीत आणि त्रुटींच्या यादीत कागदपत्रे सादर न झाल्याने किंवा अन्य कारणाने नाव अपात्र यादीत आले असेल आणि संबंधित मतदाराकडे आवश्यक कागदपत्रे असल्यास ती त्यांनी पाच दिवसांच्या आत म्हणजे २० सप्टेंबरपूर्वी विद्यापीठ कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 SEP 2017
महाराष्ट्र टाईम्स

# विद्यापीठ सिनेटसाठी १७ नोव्हेंबरला मतदान

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमान्वये होणारी अधिकार मंडळाची निवडणूक १७ नोव्हेंबर रोजी होणार आहे. 'सुटा' च्या विरोधात संस्थाचालक व अभाविप ही विद्यार्थी संघटना एकत्र आले आहेत. रयत व विवेकानंद संस्थाच 'सुटा'च्या विरोधात गेल्याने ही संघटना एकाकी पडली आहे. १७ नोव्हेंबर रोजी मतदान तर २० नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या सर्वच अधिकार मंडळावर सध्या शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीची सत्ता आहे. यापुर्वी शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) या संघटनेची अनेक मंडळांवर सत्ता होती. पण गेल्या काही वर्षांत संघटनेची ताकद कमी झाली. संस्थाचालकांनी त्यांच्या विरोधात आघाडी करून सत्ता मिळवली. गत निवडणुकीत विवेकानंद व रयत या दोन मोठ्या संस्था सुटाच्या बरोबर होत्या. पण निवडणुकीच्या हालचाली सुरू होताच या संस्थातही विकास आघाडीत सहभागी करून घेण्यात आल्या. पालकमंत्री चंद्रकांत पाटील, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय डी पाटील, 'रयत'चे अनिल पाटील, प्राचार्य क्रांतिकुमार पाटील, विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, आमदार सतेज पाटील यांनी पुढाकार घेत आघाडी तयार केली आहे. या आघाडीत सर्वच संस्थाचालक सहभागी झाल्याने ती आघाडी भक्कम झाली आहे.

गेल्या पाच सहा वर्षांत सुटामध्ये पडलेली फूट, नेतृत्वाबाबतच्या तक्रारी यामुळे 'सुटा'चा प्रभाव कमी झाला आहे. त्यांच्या विरोधातील आघाडीत सर्वच विरोधक एकत्र आले आहेत. यामुळे ही निवडणूक एकतर्फी होण्याची चिन्हे दिसत आहेत.

शुक्रवारी या निवडणुकीसाठी कच्ची मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली. तर अंतिम मतदार यादी १२ ऑक्टोबर रोजी जाहीर होणार आहे. उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम तारीख ३१ ऑक्टोबरपर्यंत आहे. दोन नोव्हेंबर रोजी छानन्नी प्रक्रिया केली जाणार आहे. तर चार नोव्हेंबरपर्यंत अर्ज माघार घेण्याची मुदत आहे. निवडणुकीसाठी पात्र ठरणाऱ्या उमेवारांची यादी सहा नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

16 SEP 2017
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उत्तर आधुनिकतावाद ही लवचिक संकल्पना

## विद्यापीठातील निमंत्रितांच्या व्याख्यानमालेत : प्रा. अविनाश सप्रे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

उत्तर आधुनिकतावाद ही अत्यंत लवचिक संकल्पना आहे. या संकल्पनेने पारंपरिक इतिहास लेखनाला जोरदार धक्के देऊन वस्तुनिष्ठ इतिहास लेखनाला प्रेरित करण्याचे महत्त्वाचे कार्य केले, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्रा. अविनाश सप्रे यांनी आज येथे केले. शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागातर्फे आयोजित करण्यात आलेल्या निमंत्रितांच्या व्याख्यानमालअंतर्गत 'इतिहासातील आधुनिकतावाद आणि उत्तर आधुनिकतावाद' या विषयावर ते बोलत होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित इतिहासातील आधुनिकतावाद आणि उत्तर आधुनिकतावाद' या विषयावर बोलताना प्रा. अविनाश सप्रे.

यावेळी प्रा. सप्रे म्हणाले, ज्ञानव्यवस्थेचा संबंध सत्तेशी असतो कारण समाजाला कोणत्या प्रकारचे ज्ञान द्यावयाचे, याचा निर्णय सत्ता करीत असते. म्हणून ज्ञान आणि सत्ता यांचे संबंध तपासणे गरजेचे असते, असे मांडणारा मिशेल फुको हा महान उत्तर आधुनिकतावादी विचारवंत होता. आधुनिकतावादाने दिलेल्या विवेकवाद, बुद्धी प्रामाण्यवाद, विज्ञाननिष्ठा, व्यक्तीवाद यांसारख्या तत्त्वांच्या मर्यादा तर फुकोने दाखवून दिल्याच; पण त्याही पलीकडे जाऊन पारंपरिक चौकटीतील इतिहासलेखनास जबरदस्त धक्के दिले, असेही सप्रे यांनी स्पष्ट केले.

उत्तर आधुनिकतावाद ही एकसंध विचारधारा नाही किंवा कोणी एकच एक व्यक्ती तिचा प्रवर्तक नाही. तर ती एक अतिशय लवचिक आणि वादग्रस्त संकल्पना असल्याचे सांगून प्रा. सप्रे यांनी उत्तर आधुनिकतावादाने नाकारलेल्या श्रेणी व्यवस्था, महाकथने, केंद्रीकरण इ. अनेक गोष्टींचे सविस्तर विवेचन केले. तसेच उत्तर आधुनिकतावादाचा प्रणेता ल्योतार्द याने आधुनिकतावादाची देणगी असलेल्या वैज्ञानिक सिद्धांतांच्या तटस्थतेवर प्रश्नचिन्ह उभे केल्याचेही स्पष्ट केले. दोन दिवस चाललेल्या या व्याख्यानमालेसाठी प्रा.अविनाश भाले, उमेश भोसले, प्रा सोनटक्के, प्रा. बोलईकर, प्रा. धीरज शिंदे तसेच इतिहास विभागातील विद्यार्थी व संशोधक उपस्थित होते. इतिहास विभागप्रमुख डॉ. नंदा पारेकर यांनी प्रास्ताविक तर नीलांबरी जगताप यांनी परिचय करून दिला. डॉ. अवनिश पाटील यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 SEP 2017
तरुण भारत

# प्राण्यांवर होणारी क्रूरता थांबवण्याची गरज

**कोल्हापूर :** मुक्या प्राण्यांवर विविध प्रकारे क्रुरता केली जाते. त्यांना अमानुष वागणूक दिली जाते. त्यांना अनेक प्रकारे नाहक त्रास दिला जातो. हे सर्व थांबविण्यासाठी जनजागृती करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन बेंगलोर येथील लिगल कॅपसिटी बिल्डींग या स्वयंसेवी संस्थेचे व्यवस्थापक उदयसिम्हा एन. जी. यांनी केले.

**लिगल कॅपॅसिटी बिल्डींग संस्थेचे व्यवस्थापक उदयसिम्हा एन. जी. यांचे प्रतिपादन**

शिवाजी विद्यापीठामध्ये विधि अधिविभाग, हयुमेन सोसायटी इंटरनॅशनल, इंडिया व बार कौन्सिल ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागातीला नीलांबरी सभागृहामध्ये प्राण्यांच्या हितसंबंधा विषयी कायदे व हक्क यासंदर्भात एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

अधिष्ठाता डॉ. भारती पाटील अध्यक्षस्थानी होत्या. विधी अधिविभागप्रमुख डॉ. विवेक धुपदाळे यांनी प्रस्ताविक केले. माधवी सरवदे यांनी आभार मानले. प्राचार्या, डॉ. मंगला पाटील-बडदारे, डॉ. जी. पी. माळी यांनी प्रमुख उपस्थिती दर्शवली. यावेळी अभिजीत शितोळे, अर्चना कुलकर्णी, आदित्य पाटील, सायली झांबरे यांच्यासह विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 SEP 2017
पुढारी

# 'प्राण्यांवरील क्रूरता थांबविणे आवश्यक'

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

प्राण्यांवरील क्रूरता थांबविणे अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन बंगळूर येथील लिगल कपॅसिटी बिल्डिंग या स्वयंसेवी संस्थेचे व्यवस्थापक उदयसिम्हा एन. जी. यांनी केले. शिवाजी विद्यापीठामध्ये विविध अधिविभाग, ह्यूमन सोसायटी इंटरनॅशनल इंडिया व बार कौन्सिल ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने वनस्पतीशास्त्र अधिविभागातील निलांबरी सभागृहामध्ये 'प्राण्यांच्या हितसंबंधांविषयक कायदे व हक्क' यासंदर्भातील प्रशिक्षण कार्यशाळेत ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. भारती पाटील उपस्थित होत्या. प्रस्तावना विधी अधिविभागप्रमुख डॉ. विवेक धुपदाळे यांनी केले. आभार माधवी सरवदे यांनी मानले. यावेळी प्राचार्या डॉ. मंगला पाटील-बडदारे, डॉ. जी. पी. माळी, अभिजित शितोळे, अर्चना कुलकर्णी, आदित्य पाटील, सायली झांबरे व विद्यार्थी उपस्थित होते.

16 SEP 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्राण्यांच्या हितसंबंधांविषयी कार्यशाळा

**कोल्हापूर :** 'प्राण्यांवरील क्रूरता थांबविणे आवश्यक आहे,' असे प्रतिपादन बंगळुरू येथील लिगल कॅपॅसिटी बिल्डिंग स्वयंसेवी संस्थेचे व्यवस्थापक उदयसिम्हा एन. जी. यांनी केले. शिवाजी विद्यापीठामध्ये विधी अधिविभाग, ह्यूमन सोसायटी इंटरनॅशनल/इंडिया व बार कौन्सिल ऑफ इंडिया यांच्या संयुक्त सहकार्याने आयोजित 'प्राण्यांच्या हितसंबंधांविषयीचे कायदे व हक्क' या संदर्भात प्रशिक्षण कार्यशाळेत ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. भारती पाटील होत्या. नीलांबरी सभागृहात कार्यक्रम झाला.

उदयसिम्हा यांनी प्राण्यांवर होणारी क्रूरता थांबविण्यासाठी मोठ्या प्रमाणात जाणीव-जागृती निर्माण करणे गरजेचे आहे, असे सांगितले. विधी अधिविभागप्रमुख डॉ. विवेक धुपदाळे यांनी कार्यक्रमाची रूपरेषा दिली. या वेळी प्राचार्या डॉ. मंगला पाटील-बडदारे, डॉ. जी. पी. माळी उपस्थित होते. अभिजित शितोळे, अर्चना कुलकर्णी, आदित्य पाटील, सायली झांबरे यांनी सहकार्य केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 SEP 2017
महाराष्ट्र टाईम्स

# विद्यापीठात कार्यशाळा

**कोल्हापूर :** प्राण्यांवरील अत्याचार थांबविणे अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन बेंगळूरु येथील लिगल कॅपॅसिटी बिल्डिंग या स्वयंसेवी संस्थेचे व्यवस्थापक उदयसिम्हा एन.जी. यांनी केले. शिवाजी विद्यापीठामध्ये विधी अधिविभाग, ह्यूमन सोसायटी इंटरनॅशनल व बार कौन्सिल ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र विभागात प्राण्यांच्या हितसंबंधांविषयक कायदे व हक्क यासंदर्भात एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ.भारती पाटील उपस्थित होत्या. माधवी सरवदे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 SEP 2017
Times of India

# State-run schools to be digitalised by year-end

Times News Network

**Kolhapur:** The district primary education department has signed a Memorandum of Understanding (MoU) with the Shivaji University, Kolhapur (SUK) for speedy digitalisation of schools in the district.

"The formalities regarding the same were completed a few weeks back," said Subhash Chougule, district primary education officer.

Chougule told **TOI**, "The department has signed a MoU with the SUK for using their infrastructure for training purposes. Apart from it, a MoU will also be signed with the Rotary club of Kolhapur in a week's time."



## SUK TO PROVIDE INFRASTRUCTURE

The department is trying to convert the conventional schools into digital ones by the end of this year.

Chougule said, "The department had an early deadline in May this year. They wanted to achieve a target of 2,002 schools by making it digital-friendly. To achieve this, we needed a strong public participation. However, many schools have remained behind us just because the financial requirement has not been fulfilled. Therefore, the process is being sped up now."

He added, "At present, over 900 schools out of 2,002 have been made digital friendly. They have the required software and the hardware material. Religious as well non-government organisations have contributed for achieving the goal."

The state government's school education and sports department via April 19 GR had said that it will take assistance from the Rotary South Asian Society (RSAS) for converting over 18,000 government and private-aided schools digital across the state.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

16 SEP 2017
पुढारी

# 'विवेकानंद'मध्ये 'एसआरपीडी' कार्यशाळा

**कोहापूर : प्रतिनिधी**

विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांच्या लेखी परीक्षांना ४ आक्टोबरपासून प्रारंभ होत आहे. या अभ्यासक्रमापैकी १३ अभ्यासक्रमांच्या परीक्षा एसआरडीपी प्रणालीद्वारे म्हणजेच ई-मोडद्वारे घेण्यात येणार आहेत. या प्रणालीबाबत तांत्रिक माहिती देण्यासाठी विवेकानंद महाविद्यालयात बुधवारी कार्यशाळा पार पडली.

शिवाजी विद्यापीठाच्या एसआरपीडी (स्क्युरीटी रिमोट पेपर डीस्ट्रीब्युशन) प्रणालीच्या सॉफ्टवेअरबाबत परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांनी मार्गदर्शन केले. काकडे म्हणाले, 'गतवर्षी विद्यापीठाने एसआरपीडीमार्फत घेतलेल्या परीक्षा यशस्वी झाल्या. यावर्षी परीक्षेत वाढ करण्यात आली असून ३३०० पेपर एसआरपीडीच्या माध्यमातून घेण्यात येणार आहेत. महाविद्यालयांनी संगणक प्रणालीचा अवलंब करून परीक्षेसंदर्भात गोपनीयता राखण्यासाठी अनुकुलता दर्शविली. यावेळी प्राचार्य डॉ. एस. वाय होनगेकर, डॉ. सुरेश गवळी, डॉ. एस. आर. पाटील, यांच्यासह प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.